माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २३०,२३१/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. अली अनवर मोहम्मद बाबर शेख,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या., (महावितरण) उमरेड ता. उमरेड जि. नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**

**महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या., (महावितरण) उमरेड ता. उमरेड जि. नागपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०८.२०२४**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : अनुपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १५.०६.२०२२ | --- | ११.०८.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) नुसार व्दितीय अपील क्र. १२१७/२०२० व १२१९/२०२०, दिनांक १५.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या., (महावितरण) उमरेड ता. उमरेड जि. नागपूर अनुपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या., (महावितरण) उमरेड ता. उमरेड जि. नागपूर अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या **व्दितीय अपील क्र. १२१७/२०२०** मध्ये दिनांक १५.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

" अपीलकर्ता यांच्या जोडपत्र –अ च्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या., उपविभाग उमरेड यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले. त्यानुषंगाने अपिलार्थी यांनी सन २०१७ ते २०२० या कालावधीत देखभाल दुरुस्तीचे कंत्राट ज्या इलेक्ट्रीक कंत्राटदारांना दिले त्यांचे नाव, पत्ता व शैक्षणीक पात्रता या बाबत माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. परंतु अपीलार्थी यांनी सदर माहिती अपूर्ण असल्याचा आक्षेप केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात माहिती अधिकार अधिनियम कलम २(च ) नुसार अपीलार्थीस उपलब्ध माहिती पुनश्च: प्रदान करावी,." असे आदेशीत करुन प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

तसेच **व्दितीय अपील क्र. १२१९/२०२०** मध्ये दिनांक १५.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

" अपीलकर्ता यांना जोडपत्र – अ च्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. मात्र सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांनी सदर माहिती अपूर्ण असल्यचा आक्षेप केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुरविलेल्या माहितीमधील ग्राहकांची माहिती असे नमुद केलेल्या पृ. क्र.. १ मधील माहिती पुनश्च: देण्यात यावी. ही बाब लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी संपुर्ण पृष्ठांची स्वच्छ छायांकीत प्रत सदर आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी." असे आदेशीत करुन प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

तक्रार क्र. २३० व २३१/२०२२ यात १२१७/२०२०, व १२१९/२०२० यात १५.०६.२०२२ रोजी पारीत आदेशात अपीलार्थी यांना याआधिच प्रदान करण्यात आलेली माहिती याची संपूर्ण पृष्ठांची स्वच्छ व छायांकीत प्रत प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या वतीने अपीलार्थी यांना कार्यालयीन अभिलेखात कलम २(च) प्रमाणे दि. ०१.०८.२०२२ रोजी प्रदान करण्यात आली व सदर माहिती प्रदान केल्याचा अनुपालन अहवाल दि. २३.०२.२०२३ रोजी सादर करण्यात आला. यात अपीलार्थी यांच्या म्हणण्यानुसार प्रदान करण्यात आलेल्या माहितीतील पृष्ठ क्र. ८ यातील Consumer Information असे शिर्षक असणाऱ्या पानातील वरच्या भागातील उजव्या बाजुला उभ्या पानावर आणि आडव्या पानावरील डाव्या बाजुला छायांकीत केलेल्या पृष्ठावर असलेली माहिती ही जाणून बुजून दडविण्यात आलेली असल्याचे अपीलार्थी यांनी नमुद केले असून उपरोक्त पृष्ठांची कुठल्याही अडथळ्यावीना व त्यातील सर्व मजकूर स्पष्टपणे वाचता येईल अशा प्रकारची प्रत अपीलार्थीस पुनश्च एकदा पुरविण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे. वरील माहिती ज्या नस्तीवर उपलब्ध आहे, त्या नस्तीची प्रत अवलोकनार्थ अपीलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात यावी त्यांनी अवलोकन केल्यानंतर त्या पृष्ठांची स्वच्छ व छायांकीत

प्रती तात्काळ विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उमरेड यांच्या वतीने तक्रारकर्ता यांना प्रदान करण्यात याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २९.०८.२०२४

जा.क्र.-7277-दि.------------

4 OCT 2024

E:\SA \तक्रार 29.08.2024\230,231/2022 अली अनवर .docx